● चंपाकलीत गाजलेले लताचे 'छुप गया कोई रे दूर से पुकार के...' गाणे. ● तेलुगु गाण्याच्या धूनीवर बनवलेले 'पहले फिर भगवान' *मिस मेरीत* गाजले. ● हेमंतकुमारांच्या संगीतात किशोरकुमार प्रथमच गायले.

□ इसाक मुजावर

चंपाकली(१९५७):

हिलस्टेशन, *यहुदी की लडकी*, *फॅशन* व *एक झलक* या प्रदीपकुमारच्या चार चित्रपटाबरोबरच हेमंतकुमारनी १९५७ साली *पायल*, *कितना बदल गया इन्सान*, *चंपाकली*, *बंदी*, *मिस मेरी* हे आणखी पाच चित्रपट संगीतबद्ध केले होते आणि ते सर्व धरून १९५७ या एकाच वर्षात त्यांचे एकूण नऊ चित्रपट पडद्यावर आले होते. अन्य कोणाही संगीतकाराने इतके चित्रपट त्यावर्षी संगीतबद्ध केलेले नसल्यामुळे दहा चित्रपटांचा एक उच्चांक यावर्षी त्यांनी प्रस्थापित केला होता. दहा चित्रपटांपैकी त्यांचा *चंपाकली* हा चित्रपट फिल्मीस्तानचा होता.

१९५२ साली फिल्मीस्तान-चा *आनंदमठ* हा चित्रपट संगीतबद्ध करून हेमंतकुमार सर्वात प्रथम संगीतकार बनले. त्यानंतर *जागृति*, *नागिन*, *सम्राट* व *शर्त*, *भागवत महिमा*, *दुर्गेश नंदिनी* हे फिल्मीस्तानचे आणखी सहा चित्रपट त्यांनी संगीतबद्ध केले. १९५७चा *चंपाकली* त्यांनी संगीतबद्ध केलेला आठवा चित्रपट. भारत भूषण या चित्रपटाचा नायक होता आणि प्रदीपकुमारची गाणी गाणाऱ्या हेमंतकुमारनी या चित्रपटात त्याला देखील आपल्या आवाजात गायला लावले होते. पण त्यांच्या आवाजातील एकट्याचे असे एकही गाणे या चित्रपटात नव्हते 'ओ मेरे साईबाबा' हे साई महात्म्य सांगणारे एक गाणे या चित्रपटात त्यांनी कोरसबरोबर गायले होते व 'ओजी, ओजी छोडो भी दुपट्टा मेरा जादूगर बालमा' हे गाणे लताबाईंच्या-बरोबर. आपल्याबरोबर रफीचा आवाजदेखील या चित्रपटात त्यांनी घेतला होता. 'ओ ग्वालन क्यों मेरा मन तेरी चितवन ले गई' हे गाणे रफीने या चित्रपटात एकट्याने गायले होते तर 'जा जा जा ओ माखन चोर' हे गाणे लताबाईंच्याबरोबर. गायिकांच्या गाण्यात लताबाईंच्या एकटीच्या आवाजावरच हेमंतकुमारनी हा चित्रपट फुलवला होता. 'खुली हवा में डोले रे, आज मेरा मन बोले रे', 'नजाने ये चंदा न जाने ये सितारे', 'जा जा ओ रसिया सावन के दिन आये', 'छुप गया कोई रे दूरसे पुकार के' व 'दुनिया भर की नदियों का जब मालिक है तेरे बादलों की' ही पाच गाणी या चित्रपटात लताबाईंच्या एकटीच्या आवाजात होती. या गाण्यांपैकी 'छुप गया कोई रे' हे गाणे या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते.

मेहमूदशी जोडी जमल्यानंतर शुभा खोटेची प्रतिमा आपल्या चित्रपटातील एका हास्य-अभिनेत्रीची झाली होती. पण *चंपाकलीत* ती सुचित्रा सेनबरोबर एक नायिका होती आणि लताबाईंची गाणी या चित्रपटात सुचित्रा सेनबरोबर तिच्यावर देखील चित्रीत करण्यात आली होती. राजेंद्र कृष्णनी या चित्रपटाची एकजात सारी गाणी लिहिली होती.


हेमंतकुमार


लता मंगेशकर


किशोरकुमार

मिस मेरी(१९५७):

हेमंतकुमारनी १९५७ साली जे नऊ चित्रपट संगीतबद्ध केले त्यापैकी *पायल*, *कितना बदल गया इन्सान* व *मिस मेरी* हे तीन चित्रपट मद्रासचे होते आणि या चित्रपटांपैकी *मिस मेरी* हा चित्रपट व या चित्रपटातील त्यांचे संगीत चांगलेच लोकप्रिय ठरले होते. स्वतः गायक असल्यामुळे आपल्या संगीतात प्रत्येक चित्रपटात स्वतः गाण्यावर हेमंतकुमार यांचा कटाक्ष असायचा. १९५४चा त्यांचा *जागृति* हा चित्रपट याला अपवाद होता. या चित्रपटातील एकही गाणे त्यांनी स्वतः गायलेले नव्हते. *जागृति*बरोबरच १९५४ साली फिल्मीस्तानचा *सम्राट* हा चित्रपट संगीतबद्ध करीत असताना हेमंतकुमारनी या चित्रपटात देखील स्वतः एकही गाणे गायलेले नव्हते.

जागृति व *सम्राट*नंतर १९५७ साली *मिस मेरी* या चित्रपटातदेखील हेमंतकुमारांचे गाणे नव्हते. रेखाचा पिता जेमिनी गणेशन या चित्रपटाचा नायक होता आणि त्याला हेमंतकुमारनी या चित्रपटात रफीच्या आवाजात गायला लावले होते. 'पहले पैसा फिर भगवान बाबू देते जाना दान' व 'ये मर्द बडे दिल सर्द बडे बेदर्द चलो जी माना' ही दोन गाणी रफीने या चित्रपटात एकट्याने गायली होती. या चित्रपटाची तयारी सुरू झाली तेव्हा वहिदा रहेमानची भूमिका असलेला *राजूल भराई* हा पहिला तेलगु चित्रपट मद्रासमध्ये नुकताच पडद्यावर आला होता. या चित्रपटात वहिदा रहेमानचे फक्त एक नृत्य होते. या नृत्याने तेव्हा मद्रासमध्ये सर्वत्र लोकप्रियता मिळविली होती आणि या नृत्यगीताची ध्वनीमुद्रिका सर्वत्र वाजत होती. राजेंद्रकृष्ण *मिस मेरी* हा चित्रपट लिहायला मद्रासला गेले असता ही ध्वनिमुद्रिका त्यांच्या कानी पडली. त्या ध्वनिमुद्रिकेतील तेलगु गाण्याची ट्यून त्यांना इतकी आवडली की या ट्यूनवरच त्यांनी *मिस मेरी*तील 'पहले फिर भगवान' हे गाणे लिहिले. हेमंतकुमारनी तेलगू गाण्याच्या ट्यूनवरच हे गाणे संगीतबद्ध केले आणि तेलगू गाण्याइतकीच हिंदीत देखील या गाण्याने लोकप्रियता मिळवली. 'ये मर्द बडे दिल सर्द बडे' हे गाणे या चित्रपटात रफीबरोबर लताबाईंच्या आवाजात देखील होते. मीनाकुमारी या चित्रपटाची नायिका होती.

'ओ रात के मुसाफिर चंदा जरा बता दे' व 'वृंदावन का कृष्ण कन्हैया सबकी आँखो का तारा' ही या चित्रपटातील दोन गाणी रफी व लताबाई यांनी गायली होती. तर 'सखीरी सुन बोले पपीहा उसपार' हे गाणे लता व आशाबाईंनी. 'सो गया सारा जमाना नींद क्यो आती नहीं', 'सैया लग जा गले जा मेरा दिल जले' ही दोन गाणी लताबाईंच्या आवाजात होती. 'आई रे घिर, घिर पहली, पहली बदरिया' हे या चित्रपटातील गाणे गीता दत्तने कोरसबरोबर गायले होते.

*मिस मेरी*तील किशोरकुमारची दुय्यम भूमिका विनोदी होती आणि या विनोदी भूमिकेत हेमंतकुमार यांच्या संगीतात या चित्रपटातील 'गाना न आया बजाना न आया' हे एकच विनोदी गाणे त्याने गायले होते. हेमंतकुमार यांच्या संगीतातील त्याचे हे पहिलेच गाणे. ●